Jagdamba Education Society's
Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 23/04/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## लेखक, कवी, नाटककार विल्यम शेक्सपियर

जगातील सर्वश्रेष्ठ लेखक, नाटककार म्हणून विल्यम शेक्सपिअर यांचे नाव घेतले जाते आणि त्यांना 'फादर ऑफ ड्रामा' असेही म्हटले जाते. त्यांचा जन्म २३ एप्रिल १५६४ साली इंग्लंडमध्ये झाला. इ.स. १५८५ साली त्यांनी आपले गाव सोडून लंडन गाठले. तेथे लॉर्ड चेंबरलेन यांच्या नाटक कंपनीत एका कलाकाराच्या जागेवर विल्यम यांना काम मिळाले. हुशार विल्यमने त्यावेळी नाटकांत बदल करायला सुरुवात केली, आणि नाटकाच्या सर्वच विभागांविषयी माहिती करून घेतली. १५८५ पासून शेक्सपिअरची नाट्यकारकीर्द सुरू झाली. नट, लेखक अशी उमेदवारी केल्यावर १५९४ साली शेक्सपिअरने आपल्या काही मित्रांसमवेत Lord Chamberlain's Men या नावाची एक नाट्यसंस्था निर्माण केली. या संस्थेतर्फेच त्याची नाटके प्रथम रंगमंचावर आली. लवकरच ते अतिशय लोकप्रिय नाटककार म्हणून ओळखले जाऊ लागले.

त्यांच्या ३८ नाटकांपैकी १० ऐतिहासिक नाटके आहेत, १६ सुखात्मिका आहेत तर १२ शोकात्म नाटके आहेत. त्यांची अगदी प्रारंभीची नाटके म्हणून 'रिचर्ड तिसरा' व 'हेन्री सहावा' ही ऐतिहासिक नाटके ओळखली जातात. 'टायटस अँड्रोनिकस', 'कॉमेडी ऑफ एरर्स' व 'टेमिंग ऑफ द श्र्यू' ही नाटके त्यांच्या उमेदवारीच्या काळातील मानली जातात. शेक्सपिअरचे 'रोमिओ अ‍ॅण्ड ज्युलिएट' हे नाटक अत्यंत लोकप्रिय ठरले. १५९९ च्या सुमारास शेक्सपिअरने लिहिलेली आणखी एक श्रेष्ठ शोकांतिका 'ज्युलियस सीझर' ही आहे. 'हॅम्लेट', 'ऑथेल्लो', 'किंग लिअर', 'मॅकबेथ' आणि 'अ‍ॅन्टनी अ‍ॅण्ड क्लिओपाट्रा' या नाटकांतून शेक्सपिअर यांच्या प्रतिभेचे अत्युच्च दर्शन घडते. जगातील सर्व प्रमुख भाषांमध्ये शेक्सपिअर यांच्या नाटकांची भाषांतरे झाली आहेत. शेक्सपिअर यांचे २३ एप्रिल १६१६ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Apr 23, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401